दि. ०६/०९/२०२१

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| गुन्हा नोंद क्रमांक | पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ चे कलम ७ अ प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री. ज्ञानेश्वर बाबुराव साळुंखे, वय ५० वर्षे, व्यवसाय तलाठी यांचे खाजगी मदतनीस, रा. भंडीशेगांव ता.पंढरपूर जि. सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु १०००/- लाचेची मागणी |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/- |
| थोडक्यात माहिती | पडताळणी दि ०६/०९/२०२१<br>सापळा दि ०६/०९/२०२१<br>यातील तक्रारदार यांचे भाऊ यांनी मौजे शेळवे ता.पंढरपूर येथे दि ०३/०५/२०२१ रोजी शेतजमीन खरेदी केली होती. सदर शेतजमीनीचे सातबारा उता-यावर नोंद घेण्याकरीता खरेदी दस्ताची प्रत तालठी कार्यालय शेळवे येथे जमा करण्यासाठी यातील तक्रारदार तसेच त्यांचे भाऊ गेले असता यातील आरोपीची तक्रारदार यांचेशी भेट झाली व ते तलाठी यांचे खाजगी मदतनीस म्हणुन काम करीत होते.<br>त्यानंतर यातील आरोपी यांनी तक्रारदार यांचे सातबारा उता-याचे नोंदीचे काम झाले असल्याने बक्षीस म्हणुन तसेच सदर खरेदी केलेल्या जमीनीवरील बँकेचा कर्जाचा बोजा कमी करण्यासाठीचे नोंदीकरीता म्हणुन पुन्हा दिनांक ०६/०९/२०२१ रोजी रु १०००/- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता यातील आरोपी साळुंखे यांना शेळवे चौकातील बसस्टॉपसमोर सापळा कारवाईदरम्यान रंगेहाथ पकडण्यात आले आहे. यातील आरोपी यांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे<br>श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. |
| सापळा पथक | सदरची कारवाई श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर पोलीस अंमलदार/ सोनवणे, स्वामी, जानराव, सण्णके, सुरवसे नेम. एसीबी सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**- पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार ॲप** – acbmaharashtra.net

**टोल फ्री क्रमांक**- १०६४

**दुरध्वनी क्रमांक**- ०२१७-२३१२६६८

**व्हॉटस ॲप क्रमांक** – ९९३०९९७७००

सहा. पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक सोलापूर.

०६/०९

(संजीव पाटील)
पोलीस उपअधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर